International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.12 No.3 January – February 2025

महिला सबलीकरणात फुले दांपत्याचे योगदान

डॉ. कांचन विजय नलावडे

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

Corresponding Author - डॉ. कांचन विजय नलावडे

DOI -10.5281/zenodo.15516103

प्रस्तावना:

महिला सबलीकरणात महिलांमध्ये त्यांच्या क्षमतेची जाणीव, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे यावरती भर दिला गेला. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीला गौण स्थान होते. स्त्रियांना शिक्षण देण्याची व त्यांना विचार प्रवृत्त करण्याची गरज आहे हे ओळखून समाजसुधारकांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. स्त्री शिक्षणाची चळवळ जोमाने उभी करून स्त्रीला एक माणूस म्हणून मान –सन्मान प्राप्त करुन दिला. मुली शिकू लागल्या; प्रौढ स्त्रिया शिकू लागल्या. स्त्री शिक्षणाच्या कामी त्यांनीही अपूर्व कामगिरी बजावली. नोकरी धंद्यात प्रवेश केला. स्त्री जीवनाच्या सर्वांगिण विकासासाठी अतोनात मेहनत घेतली जाऊ लागली. महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी, त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी केलेले कार्य अभूतपूर्व असे आहे. स्त्रियांच्या सन्मानातून तो समाज व देशही प्रगती पथावर जातो हे ओळखून फुले दांपत्याने केलेले कार्य काळाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण असे आहे.

उद्दिष्टे:

१) महिला सबलीकरण संकल्पना समजून घेणे.

२) महात्मा जोतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची स्त्रियांच्या शिक्षणाबाबतची भूमिका समजून घेणे.

३) महात्मा जोतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्रियांच्या सबलीकरणासाठीचे सामाजिक कार्य समजून घेणे.

अभ्यासपद्धती :

सदरचा शोधनिबंध तयार करताना विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके यांचा आधार घेतलेला आहे.

महिला सक्षमीकरण संकल्पना :

महिला सक्षमीकरण म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी, तिच्या शरीर, मन, बुद्धी स्वत्वाची जाणीव व स्वतःबद्दल जागरूकता निर्माण करून त्यादृष्टीने स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे. स्त्रियांमध्ये हक्काची जाणीव निर्माण करणे तसेच

सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडीमध्ये त्यांच्या प्रत्यक्ष –अप्रत्यक्ष सहभागाबद्दलची जाणीव निर्माण करणे. स्त्रियांना आर्थिकदृष्टया व मानसिकदृष्टया स्वावलंबी करणे. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करून त्यांना स्वातंत्र्याबद्दल व हक्कांबद्दल जागरूक करणे ही सक्षमीकरणाचीच प्रक्रिया होय.

स्त्री शिक्षणाचे महत्त्व:

महिला सक्षमीकरणासाठी स्त्रियांना शिक्षण देऊन विचारप्रवृत्त करण्याची नितांत गरज असल्याचे अनेक समाजसुधारकांनी जाणले होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्रियांना गौण स्थान होते. त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात होती. अशावेळी समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणाची चळवळ उभी केली. फुले दांपत्याने स्त्रियांना सक्षम करण्यासाठी शैक्षणिक व सामाजिकदृष्टया केलेले कार्य विसरता येणार नाही. सामाजिक चालीरीती व रूढी परंपरेत बालविवाह, केशवपन, सतीची चाल अशी अनेक बंधने स्त्रियांवर लादली गेली होती. स्त्री-शूद्रांवरील बंधनाबद्दल, शिक्षणव्यवस्थेबद्दल प्रेमा गोरे यांनी मांडलेले विचार अतिशय बोलके आहेत, 'शिक्षण म्हणजे सारासार विचार, प्रत्येक सिद्धांत अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहणे. प्रत्येक प्रस्थापित सिद्धांताकडे शंकेखोरपणे पाहून बुद्धीच्या कसोटीला तो उतरल्यासच स्वीकारणे हा विचारच समाजात नव्हता. केवळ धर्मग्रंथाचे पठण, त्यातल्या खऱ्या - खोटया भाकडकथांचे विवेचन एवढाच शिक्षणाचा अर्थ सीमित झाला होता."[१] यावरून असे लक्षात येते की , स्त्री- शूद्रांना शिक्षणाची द्वारे खुली नव्हती. कुठलाही स्वतंत्र विचार अंमलात आणण्याची कोणतीच व्यवस्था निर्माण झालेली नव्हती . स्त्रियांना शिक्षणाची द्वारे खुली नसण्याच्या कालखंडातच पेशव्यांची राजवट संपुष्टात आली आणि इंग्रजांची राजवट सुरू झाली. इंग्रजांच्या साम्राज्यामध्ये ज्ञानाचा धुसर प्रकाश दिसू लागला. इंग्रजांनी भारतातील जनतेसाठी काही सुधारणा आणल्या. त्यामध्ये शिक्षणाची सुधारणाही होती. अनेक समाजसुधारकांनी बाळशास्त्री जांभेकर , आगरकर, गोपाळराव हरि देशमुख , भाऊ महाजन यांनी याच शाळांतून शिक्षण घेऊन आपल्या समाजातील दोषांवर प्रखर हल्ले चढविले व समाजसुधारणेसाठी प्रयत्न केले.

स्त्रियांच्या शिक्षणासाठीचे क्रांतिकारी पाऊल :

इंग्रजी शिक्षणाने प्रभावित झालेल्या जोतीरावांनी हिंदू समाजातील स्त्री- शूद्रांचा उद्धार करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखले. त्याचबरोबर पुरूषापेक्षा स्त्रीच्या शिक्षणाला विशेष महत्त्व आहे याची जाणीव जोतीरावांना प्रकर्षाने झाली. जोतीरावांनी सावित्रीबाईंच्या व मित्रांच्या सहकार्याने त्यांच्याशी विचारविनिमय करून पुण्यातील बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात दि. १ जानेवारी १८४८ रोजी मुलींची पहिली शाळा सुरु केली. त्यापूर्वीही पुण्यात मुलींची शाळा चालविण्याचे प्रयत्न झाले होते. सन १८३० ते १८३३ मध्ये निघालेल्या या शाळा पुढे दोनच वर्षात बंद पडल्या ; परंतु १८४८ मध्ये

जोतीरावांनी मुलींसाठी सुरु केलेल्या हिंदुस्थानातील या पहिल्या शाळेने जणू स्त्री शिक्षणाचा पायाच घातला. १८४८ ते १८५२ या काळात पुण्यात व पुण्याबाहेरही जोतीरावांनी १८ शाळा सुरू केल्या. सावित्रीबाईंनी स्त्री-शूद्रांच्या विकासासाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी अतिशय तळमळीने जे कार्य केले त्याबद्दल धनंजय कीर लिहितात , "एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी व्यतीत केलेले सावित्रीबाईंसारखे आदर्श नि उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल."[२] स्त्रीमुक्ती आंदोलनाला वाहून घेणारे युगपुरुष व युगस्त्री म्हणजे फुले दांपत्य होय.

जोतीरावांनी शिक्षणाकडे सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले होते. स्त्री शुद्रांना शिक्षण मिळाले तर त्यांचा आत्मविश्वास वाढेल. ध्येयवाद, पुढाकार वृत्ती, चिकित्सावृत्ती वाढीस लागेल. ज्ञानाबरोबरच सदसदविवेकबुद्धीने माणूस विचार करायला लागेल. जोतिरावांच्या शिक्षणाच्या दूरदृष्टी बद्दल भास्कर लक्ष्मण भोळे लिहितात, "लोकहिताच्या व सामाजिक प्रगतीच्यादृष्टीने ज्ञानाचा उपयोग व्हावा शिक्षणातून समाजजीवनाला उचित दिशा मिळून चारित्र्याची पक्की पायाभरणी व्हावी , असा त्यांचा आग्रह होता. शिक्षणातून नवा समाज घडवला जावा अशी त्यांची अपेक्षा होती."[३] माणूस शिक्षणामुळे जीवनातील यशाची शिखरे पार करू शकतो त्याचे जीवन समृद्ध होते. जोतीरावांना शिक्षणामुळे कोणता बदल होईल असे वाटत होते हे सांगताना डॉ . आ.ह.साळुंखे म्हणतात , 'शिक्षणामुळे सगळे जग आरपार बदलून जाईल आणि सर्वत्र सुखशांती नांदेल असे एक सुरेख देखणे स्वप्न फुले यांनी पाहिले होते."[४] शिकलेल्या लोकांनी स्वत: शहाणे झाल्यानंतर इतरांनाही शहाणे केले पाहिजे हे सांगताना जोतिराव म्हणतात ,

'तरूण शूद्रांनी विद्या संपादावी ॥ चाकरी धरावी ॥
शाळा खाती ॥ १॥

इतरांना शहाणे करण्यासाठी प्रयत्न करावेत. शाळांमध्ये मुले प्रत्यक्षात गेली पाहिजेत यासाठी सक्तीचा कायदा केला पाहिजे. शिक्षण मूठभर लोकांपुरते मर्यादित न राहता ते सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे. याकरिता १९ आक्टोंबर १८८२ रोजी हंटर कमिशन आयोगापुढे आपले निवेदन जोतिरावांनी सादर केले. मुलांनी शिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे यासाठी व्यावसायिक शिक्षणाचा आग्रह त्यांनी धरला.

सामाजिक कार्य :

समाजात सामाजिक समता, बंधुता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. शिक्षणामुळे समाजातील रूढी, परंपरा, जुन्या गैरसमजुती नष्ट होतील .स्त्री-पुरूषांमधील भेद नष्ट करण्यासाठी, जातीभेद निर्मूलनासाठीही शिक्षणाची आवश्यकता आहे हे जोतिरावांनी ओळखले होते. त्या काळातील समाजव्यवस्थेमध्ये स्त्रिया, शूद्र, अतिशूद्र यांना दिली जाणारी हीन वागणूक, शेतकरी, शेतमजूर यांचा होणारा छळ, केशवपन, बालविवाह प्रथा, विधवांचे प्रश्न, सतीची चाल यासारख्या सामाजिक प्रश्नांकडेही त्यांचे लक्ष गेले. आपल्या सामाजिक कार्याला त्यांनी शैक्षणिक

कार्यापासूनच सुरुवात केली. शिक्षणामुळे विचार प्रगल्भ होऊन त्यांना स्वत्वाची जाणीव होईल. त्यांनी बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना केली. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. जगातील दु:खे, स्त्री-पुरुष विषमतेमधूनच निर्माण झाली आहेत असा जोतीरावांचा विचार होता. प्रा. हरि नरके त्यांच्या या विचारसारणीविषयी लिहितात, "जर पुरुष स्त्रियांच्या मानवी हक्काच्या आड आले नाहीत तर या जगामध्ये निर्मिकाचे राज्य होऊन एकंदर सर्व मानव स्त्री –पुरुष संतोषी होऊन सुखी होतील, असा शांततामय सहजीवनाच्या सुखाचा मार्ग दाखवणारे जोतीराव मात्र हे नजीकच्या भविष्यात घडून येणार नाहीत."[५] स्त्री-पुरुष समतेविषयी जोतिरावांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाच्या समारोपात म्हटले आहे की,

"स्त्री पुरूषांमध्ये निवड नसावी ।। गुणे आदरावी ।।
सर्वकाळ ।।
एकोणीस शतकी ग्रंथ केला सिद्ध ।। वाचो न प्रबुद्ध।।
(५६०)

फुले दांपत्य हे केवळ बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते त्यांनी मुलींच्या पहिल्या शाळेत शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंना घराबाहेर पाठविले. त्यांना स्वत:चे मूलबाळ नव्हते. घरातील वरिष्ठांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी स्वत:च्या दुसऱ्या विवाहाला नकार दिला व सावित्रीबाईंना सन्मानाची वागणूक दिली. आपल्या घरापासूनच त्यांनी क्रांतीकार्याला सुरुवात केली. जोतीरावांच्या स्त्री-पुरुष समानतेबद्दलच्या विचाराबद्दल अरुणा दिवेगावकर म्हणतात, "स्त्री-पुरुष समानता ही निसर्गसिद्ध गोष्ट आहे असे ते ठामपणे मानीत आणि ते या विचारांशी प्रामाणिक राहिले ही फार मोठी गोष्ट होती. ते म्हणत असत, " जर पुरुष स्त्रियांच्या मानवी हक्काच्या आड आले नाहीत तर या जगामध्ये निर्मिकाचे राज्य येईल एकंदर सर्व मानव जात सुखी होईल."[६] अशा प्रकारचा शांततामय सहजीवनाचा वैश्विक मार्ग दाखविणारे फुले दांपत्य हे आगळेवेगळे रसायन होते.

समारोप :

फुले दांपत्य स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हक्क या वैश्विक मूल्यांच्या आधाराने जाती व्यवस्था, वर्गव्यवस्था, स्त्री-पुरुष विषमता यावर प्रहार करीत होते. स्त्री –स्वातंत्र्याची, स्त्रियांच्या हक्काची ही लढाई जगभरातील समस्त स्त्री जातीच्या हिताची होती. एकूणच मानवी जीवनाच्या शांततेसाठी व विकासासाठीची ही पहाट होती.

निष्कर्ष:

१) महिलांना शरीर , मन, बुद्धी, स्वत्वाची जाणीव व स्वत:बद्दल जागरूकता निर्माण करून त्यादृष्टीने स्वत:च्या विकासासाठी प्रवृत्त करणारी महिला सबलीकरण ही संकल्पना होय.

२) महिला सबलीकरणामध्ये स्त्री शिक्षण महत्वाचे मानले गेले व अनेक समाजसुधारकांनी त्यादृष्टीने प्रयत्न केले.

३) फुले दांपत्याने महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. स्त्रियांचा उद्धार आणि स्त्रीमुक्तीसाठी अतिशय तळमळीने काम केले.

४) जगातील दु:खे स्त्री –पुरुष विषमतेमधूनच निर्माण झाली आहेत. त्यासाठी स्त्री स्वातंत्र्याची, स्त्रियांच्या हक्काची लढाई जगभरातील समस्त स्त्री जातीच्या हितासाठी, विकासासाठी फुले दांपत्याने लढली.

संदर्भ :

१) गोरे प्रेमा: 'थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले', विद्या प्रकाशन, पुणे द्वितीयावृत्ती १९८९, पृ. ११.

२) कीर धनंजय: 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६८, पृ. ३०१

३) भोळे भास्कर लक्ष्मण:'भारतीय साहित्याचे निर्माते महात्मा जोतीराव फुले', साहित्य अकादमी, मुंबई, प्रथमावृत्ती १९९६, पृ. ४५.

४) साळुंखे (डॉ) आ.ह. :'महात्मा फुले आणि शिक्षण', लोकायत प्रकाशन, सातारा प्रथमावृत्ती २०१३, पृ. ३३

५) नरके हरि,: 'महात्मा जोतीराव फुले : पर्यायी समाजव्यवस्थेचे शिल्पकार', नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर प्रथमावृत्ती ११ एप्रिल २०२३, पृ. १५

६) दिवेगावकर अरुणा,: 'जोतिर्मय सावित्री : एक समताधिष्ठित सहजीवन', हरिती पब्लिकेशन, पुणे पृ.३५.